ePaper
धारावी पुनर्विकास अदानींकडे, 5,069 कोटींची सर्वाधिक बोली



वर्ष - 6 । अंक - 226 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । बुधवार । दिनांक 30 नोव्हेंबर 2022 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

आतील पानांत

- पुण्यातही पाणीबाणी
- संविधान संवाद अभियान!
- धारावीचं घबाड अदानीच्या घशात!



# खेड-आळंदी विधानसभेत ‘आप’ची धडक!

## प्रस्थापितांना धक्का : मयुर दौंडकर यांच्याकडून युवकांची मोर्चेबांधणी

**। खेड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**खेड-आळंदी विधानसभा मतदार संघातील युवकांची मोर्चेबांधणी करीत आम आदमी पार्टीकडून जोरदार धडक देण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. आप युवा आघाडीचे अध्यक्ष मयुर दौंडकर यांनी याबाबत पुढाकार घेतला असून, प्रस्थापितांना धक्का मानला जात आहे. खेड-आळंदी विधानसभा मतदार संघातील प्रलंबित प्रश्न आणि समस्या सोडवण्यासाठी आम आदमी युवा आघाडीच्या पुढाकाराने “युवा संवाद” कार्यक्रम घेण्यात येणार आहे.त्यासाठी मतदार संघात सर्वत्र जोरदार ‘ब्रँडिंग’ करण्यात येत आहे.**

येत्या दि. ४ डिसेंबर रोजी चाकण येथील मिरा मंगल कार्यालयात हा मेळावा होणार असून, राज्यपातळीवरील ‘आप’चे पदाधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. खेड-आळंदीमध्ये राष्ट्रवादी आणि शिवसेना यासह भाजपाचे वर्चस्व आहे. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले प्रश्न मात्र केंद्रात, राज्यात आणि नगर परिषदेत सत्ते असलेल्या स्थानिक नेत्यांकडून अद्यापही सुटलेले नाहीत. परिणामी, मतदार संघातील युवकांच्या मनात असंतोष असून, सनदशीर मार्गाने नगरपरिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार लोकाभिमूख कसा होईल? यासाठी ‘आप’ मैदानात उतरली आहे. आप युवा आघाडीचे अध्यक्ष मयुर दौंडकर म्हणाले की, राजकीय श्रेयवाद आणि इच्छाशक्तीअभावी अनेक प्रश्न रखडलेले आहेत. पुणे- नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडी, अस्वच्छ आणि दूषित पाणीपुरवठा, कचरा समस्या, इंद्रायणी नदी स्वच्छता आणि पुनरुज्जीवन, प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न, मतदार संघातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी नाहीत, एमआयडीतील कंत्राटी कामगारांच्या अनेक समस्या आहेत. यासह मतदार संघातील नागरिकांची जीवनशैली सुधारण्यासाठी प्रशासकीय गतीमानता आणि इच्छाशक्तीही दिसत नाही. याबाबत विचारमंथन करण्यासाठी हा “युवा संवाद” आयोजित केला आहे.

### राष्ट्रवादी, सेना-भाजपाला आव्हान

राज्यात शिवसेना शिंदे गट आणि भाजपाची सत्ता आहे. खेड- आळंदी मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सत्ता आहे. अशा परिस्थिती पुणे जिल्ह्यात प्रथमच आम आदमी पार्टी युवा आघाडीकडून “युवा संवाद” कार्यक्रम घेण्यात येत आहे. विशेष म्हणजे, ‘आप’चे प्रदेशाध्यक्ष रंगा राचुरे, युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य शिंदे, राज्य संघटक संदीप सोनवणे, पुणे संयोजक मुकूंद किर्दत असे दिग्गज मान्यवर या मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे खेड-आळंदी मतदार संघातील राष्ट्रवादीसह सेना-भाजपाच्या स्थानिक नेत्यांसमोर आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ‘आप’चे तगडे आव्हान उभे राहणार आहे.




### मतदार संघात ‘आप’ नवा पर्याय...

खेड-आळंदी मतदार संघात सेना, राष्ट्रवादी आणि भाजपा असे सत्तेचे वर्तुळ दिसते. त्यामुळे मतदार संघातील नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यात आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यात स्थानिक नेत्यांना अपयश आले आहे. राजकीय रस्सीखेचमध्ये मतदार संघातील नागरिकांपुढे ‘आप’ सारखा सक्षम पर्याय समोर येत आहे. ‘आप’ सर्वेसर्वा आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या विचारांचा सुशिक्षित युवकांवर प्रभाव आहे. पंजाब आणि गोवा विधानसभा निवडणुकीत यशानंतर ‘आप’ची प्रतिमा जनमानसात ‘प्रस्थापितांना प्रभावी पर्याय’ अशी झाली आहे. त्यामुळे खेड-आळंदीत नव्या उमेदीने कामाला लागलेल्या ‘आप’ला जनाधार मिळेल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.





# पुण्यातही पाणीबाणी!

## मुंबईनंतर आता पुण्याही अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा बंद

**पुणे । महाईन्यूज ।**

मुंबईत आजपासून ४८ तासांसाठी पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला आहे. त्यानंतर आता पुण्याही अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा थांबवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत पाईपलाईनच्या दुरुस्तीच्या कामासाठी पुढील दोन दिवस पाणीपुरवठा बंद राहणार आहे. याशिवाय आता महाराष्ट्रातील शैक्षणिक सिटी आणि आयटी सिटी अशी ओळख असलेल्या पुण्यातही पाणीबाणीची स्थिती निर्माण झाली आहे. कारण आता पुणे महानगरपालिकेनं शहरातील पाच महत्वाच्या भागांमध्ये पाणीपुरवठा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळं आता पुणेकरांना पाणीपुरवठा बंद झाल्यामुळं मोठा मनस्ताप सहन करावा लागणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे शहरातील बाणेर, बालेवाडी, पाषाण, कोथरूड आणि शिवाजीनगर या भागांमध्ये पुढील दोन दिवस म्हणजेच गुरुवारपर्यंत पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय पुणे महापालिकेनं घेतला आहे. शहरातील जलशुद्धीकरण केंद्रांवरील विद्युत दुरुस्ती आणि देखभालीच्या कामासाठी पाणीपुरवठा बंद करण्यात येत असल्याची माहिती पुणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यामुळं आता ऐन हिवाळ्यात पाणीपुरवठा बंद झाल्यानंतर पुणेकरांच्या अडचणी वाढल्या आहेत.

### पुणेकरांनो, पाणी जपून वापरा...

**पुण्यात महापालिकेनं शहरातील बहुतांश भागांमध्ये पाणीपुरवठा बंद केल्यानं लोकांना कमीत कमी पाण्यात दैनंदिन गरजा भागवाव्या लागणार आहेत. याशिवाय उपलब्ध असलेलं पाणी जपून वापरण्याचं आवाहन शहरवासियांना केलं जात आहे. पुणे आणि मुंबई या दोन्ही शहरांमध्ये एकाचवेळी दोन दिवसांची पाणीबाणी जारी करण्यात आल्यानं लोकांना पुढील ४८ तास पाणी जपून वापरावं लागणार आहे.**

# चांगला समाज निर्माण करणे हे शिक्षकांचे ध्येय असावे

## पुरस्कार वितरण सोहळ्यात मा.खा.राजू शेट्टी यांचे प्रतिपादन

**पुणे । महाईन्यूज ।**

जसा शेतकरी शेतीची मशागत करतो व मग चांगलं पीक येतं, तसे शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या विचारांची मशागत करावी व चांगला समाज, विद्यार्थ्यांचे भवितव्य व पर्यायाने देश घडवावा असे मत माजी खासदार राजू शेट्टी यांनी जगदीशब्द फाउंडेशन आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात व्यक्त केले.




क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिक्षक दिन म्हणून जगदीशब्द फाउंडेशन व परिवर्तन सामाजिक संस्था यांच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्यस्तरीय क्रांतीसुर्य व क्रांतीज्योती पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथे माजी खासदार राजू शेट्टी यांच्या विशेष उपस्थितीत मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या दिशा पिंकी शेख, पत्रकार श्रीरंग गायकवाड, भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई, ज्येष्ठ विधीज्ञ विजय कुरले, साहित्यिक नारायण सुमंत, व्याख्याते जगदीश ओहोळ, परिवर्तन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महादेव वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

या पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्यातील सर्व जिल्ह्यातून पुरस्कारार्थी निवडण्यात आले होते. शैक्षणिक, सामाजिक, उद्योग, आरोग्य, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांना यावेळी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगदीश ओहोळ व सूत्रसंचालन जालिंदर राऊत यांनी केले तर आभार महादेव वाघमारे यांनी मानले.

# पिंपरी-चिंचवड पोलीस दलात लवकरच 546 पदांची भरती

**पुणे । महाईन्यूज ।**




पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात मनुष्यबळाची कमतरता आहे. दरम्यान भरतीचा एक टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्यातील भरती जाहीर झाली आहे. शहर पोलिसांनी तिसऱ्या टप्प्यातील भरतीची देखील तयारी सुरू केली आहे.

पहिल्या टप्प्यात 720 पदांची भरती झाली असून दुसऱ्या टप्प्यात 216 जागा जाहीर करण्यात आल्या आहेत. तसेच तिसऱ्या टप्प्यात 546 पदांची भरती केली जाणार आहे. तिसऱ्या टप्प्यातील पोलीस भरतीच्या हालचाली सुरु झाल्या आहेत.

पहिल्या टप्प्यात 720 पैकी 50 उमेदवार परीक्षा घोटाळ्यात अपात्र झाले. ती पदसंख्या दुसऱ्या टप्प्यात अधिकची मंजूर होऊन दुसरा टप्पा 216 पदांचा जाहीर झाला. 30 नोव्हेंबर पर्यंत दुसऱ्या टप्प्यातील भरतीसाठी उमेदवारांना ऑनलाईन माध्यमातून अर्ज करता येणार आहे.

# रिक्षाचा संप पीएमपीला लाभला!



**पुणे । महाईन्यूज ।**

रिक्षा संघटनांनी सोमवारी केलेल्या संपामुळे प्रवाशांची काही प्रमाणात गैरसोय झाली असली तरी, पीएमपीच्या तिजोरीत मात्र पहिल्यांदाच भरघोस उत्पन्न जमा झाले आणि १५ लाखांहून अधिक प्रवाशांनी पीएमपीच्या बसचा वापर केला. पीएमपीच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक झाली आहे.

या पूर्वी ४ जानेवारी २०१६ आणि १४ नोव्हेंबर रोजी दोन कोटी रुपयांच्या उत्पन्नाचा टप्पा पीएमपीला पार करता आला होता. परंतु, त्या वेळी पास विक्रीची रक्कम २० लाखांहून जास्त होती. यंदा प्रथमच निव्वळ तिकिट विक्रीतून उत्पन्न वाढले आहे. पीएमपीने दोन्ही शहरांबाहेरील जिल्ह्यातील ११ मार्गांवरील वाहतूक २६ नोव्हेंबर रोजी बंद केली आहे. त्यामुळे त्या मार्गांवरील १०० बसही शहरांतर्गत वाहतुकीसाठी पीएमपीला वापरता आल्या. पीएमपीच्या ताफ्यात सीएनजीवर धावणाऱ्या आणि ई-बसची संख्या वाढत आहे. या बसचा प्रवास आरामशीर असल्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी यांचा पीएमपीकडे वाढता कल असल्याचे प्रशासनाने नमूद केले.

'पीएमपीएमएल'स्थापनेपासून (२००७) प्रथमच......

- निव्वळ तिकीट विक्रीतून मिळाले १ कोटी ९२ लाख ८ हजार ९६८ रुपये तर, पास विक्रीतून १२ लाख ६२ हजार आणि एकूण उत्पन्न २ कोटी ४ लाख ७८ हजार ७२३ रुपये

- एकूण १७४० बस रस्त्यावर धावल्या; एरवी पीएमपीच्या सरासरी १६०० बस रस्त्यावर असतात

- एकूण १५ लाख ४७ हजार प्रवाशांनी केला बसचा वापर

### या मार्गांवरील वाहतूक होणार सुरु

- १- ५७ - पुणे स्टेशन ते वडगांव/वेणुताई कॉलेज
- २- १४४ - पुणे स्टेशन ते एनडीए गेट नं. १०
- ३- १४०- पुणे स्टेशन ते अप्पर डेपो
- ४ - ३३३ (बीआरटी) - पुणे स्टेशन ते हिंजवडी
- ५ - १५८ - म.न.पा. भवन ते डी. वाय. पाटील कॉलेज
- ६ - १६३ (बीआरटी) - पुणे स्टेशन ते खराडी, ढोले पाटील कॉलेज
- ७ - ३१२ (बीआरटी) - पुणे स्टेशन ते पुणे स्टेशन ते चिंचवडगांव
- ८ - १५८ - म.न.पा. भवन ते डायमंड वॉटर पार्क, दादाची पडळ (वाघोली)

कोरोना काळात बंद झालेल्या पुणे रेल्वे स्थानकावरून ८ मार्गांवरील पीएमपीची बससेवा आता पूर्ववत करण्यात येत असल्याचे प्रशासनाने जाहीर केले आहे. पुणे स्टेशनजवळील मोलेदिना बसस्थानक येथून बस सुटल्यावर पुणे रेल्वे स्टेशन समोरील लेन क्रमांक ४ येथे प्रवाशी चढ-उतार करून नियमित मार्गाने वाहतूक करणार आहेत. वाहतूक बुधवारपासून (ता. ३०) सुरू होणार आहे.

**४ जानेवारी २०१६ आणि १४ नोव्हेंबर रोजी दोन कोटी रुपयांच्या उत्पन्नाचा टप्पा पीएमपीला पार करता आला होता. परंतु, त्या वेळी पास विक्रीची रक्कम २० लाखांहून जास्त होती. यंदा प्रथमच निव्वळ तिकिट विक्रीतून उत्पन्न वाढले आहे. पीएमपीने दोन्ही शहरांबाहेरील जिल्ह्यातील ११ मार्गांवरील वाहतूक २६ नोव्हेंबर रोजी बंद केली आहे. त्यामुळे त्या मार्गांवरील १०० बसही शहरांतर्गत वाहतुकीसाठी पीएमपीला वापरता आल्या. पीएमपीच्या ताफ्यात सीएनजीवर धावणाऱ्या आणि ई- बसची संख्या वाढत आहे. या बसचा प्रवास आरामशीर असल्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी यांचा पीएमपीकडे वाढता कलअसल्याचे प्रशासनाने नमूद केले.**

# आंदोलनकर्त्या अडीच हजार रिक्षाचालकांवर गुन्हा!

## पुण्यात रिक्षाचालकांच्या आंदोलनानंतर जाग, टॅक्सीबाईक 'रॅपिडो' कंपनीवर गुन्हा दाखल

पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बाइक टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करुन ती तात्काळ बंद करावी, या मागणीसाठी आरटीओ समोर ठिय्या आंदोलन करुन रिक्षा चौकात पार्क करुन संपूर्ण आर टीओ चौकातील वाहतूक अडवून शासकीय अधिकाऱ्याच्या आदेशाचा अवमान करणाऱ्या रिक्षा संघटनांच्या नेत्यांसह अडीच हजार रिक्षाचालकांवर पोलिसांनी रात्री उशीरा गुन्हा दाखल केला आहे. बघतोय रिक्षावाला संघटनेचे अध्यक्ष डॉ. केशव क्षीरसागर, बाबा कांबळे, आनंद अंकुश व इतर २३०० ते २५०० रिक्षाचालकांवर बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

आरटीओ कार्यालयाबाहेर विविध रिक्षा संघटनांनी सोमवारी ठिय्या आंदोलन केले होते. त्यासाठी त्यांनी संपूर्ण परिसरात रिक्षा उभ्या करुन वाहतूक अडविली होती. सकाळी १० वाजता सुरू झालेले हे आंदोलन पालकमंत्री व इतरांच्या आश्वासनानंतर रात्री सव्वाआठ



वाजता मागे घेण्यात आले होते. या काळात परिसरातील संपूर्ण वाहतूक विस्कळीत झाली होती. आंदोलन काळात संपूर्ण चौकातील वाहतूक अडवून स्पीकरवरुन घोषणा देऊन बंदोबस्तावरील अधिकारी व अंमलदार यांनी त्यांना आंदोलन न करण्याबाबत सूचना व आदेश दिले होते. त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन शासकीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करता अवमान केल्याने गुन्हा दाखल करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.



### रिक्षाचालकांच्या आंदोलनानंतर जाग, टॅक्सीबाईक 'रॅपिडो' कंपनीवर गुन्हा दाखल

महाराष्ट्र सरकाराचा कोणताही वैध परवाना नसतानाही अनधिकृत टॅक्सीबाईकची वाहतूक सेवा देणाऱ्या रोपन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हेसेस (रॅपीडो) या कंपनीवर गुन्हा दाखल केला आहे. फेब्रुवारी २०२१ पासून २८ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत ॲपच्या माध्यमातून अनिधिकृत टॅक्सीबाईक धावत होत्या. या प्रकरणी पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोटार वाहन निरीक्षक तानाजी शिवाजी धुमाळ (वय ४५) यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात सोमवारी (२८) फिर्याद दिली. त्यानुसार रोपन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस (रॅपिडो) या कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाईकटॅक्सी चालवण्या संदर्भात महाराष्ट्र सरकारने कोणताही परवाना दिला नसतानाही रॅपिडो या कंपनीकडून विनापरवनागी ऑनलाईन ॲप तयार केले. हे अप कायदेशीर असल्याचे भासवून दुचाकीचालकांकडून बेकायदेशीर प्रवासी वाहतूक आपल्या स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी करून घेतली.


---

# महात्मा फुले मंडई परिसराचा कायापालट

## महामेट्रो, महापालिकेकडून आराखडा तयार, 11 कोटी 68 लाख रुपयांचा खर्च अपेक्षित

पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

ऐतिहासिक महात्मा फुले मंडई परिसराचा येत्या काही दिवसांत कायापालट होणार असून महामेट्रो आणि महापालिकेकडून मंडई परिसराचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सुरळीत वाहतूक व्यवस्था, पादचाऱ्यांसाठी विना अडथळा मार्गक्रमण, खुल्या रंगमंचाच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रम, मंडई परिसरातील ऐतिहासिक वास्तूंसाठी हेरिटेज वॉक, जुन्या मंडईच्या वास्तूच्या बाजूला नवीन भवन, मेट्रो कामांमुळे विस्थापित झालेल्या दुकानांचे पुनर्वसन अशा विविध बाबींचा या आराखड्यात समावेश आहे. त्यासाठी ११ कोटी ६८ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. महात्मा फुले मंडई परिसरात भूमिगत मेट्रो मार्गिकेचे काम सध्या वेगाने सुरू आहे. मंडईची ऐतिहासिक वास्तू आणि त्या परिसरात असणारे विविध वस्तूंचे मार्केट, दुकाने यामुळे हा परिसर अतिशय गजबजलेला असतो. लाल महाल, शनिवार वाडा, नाना वाडा, विश्रामबाग वाडा, कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी, दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर, त्रिशुंड गणपती, तुळशीबाग अशी ठिकाणे अनुक्रमे कसबा पेठ, शुक्रवार पेठ, सोमवार पेठ, बुधवार पेठ परिसरात आहेत. या सर्व ठिकाणांना जोडण्यासाठी आणि त्यांचा ऐतिहासिक वारसा सांगण्यासाठी हेरिटेज वॉक ही



संकल्पनाही या आराखड्यात समाविष्ट करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार आणि महामेट्रोचे प्रकल्प संचालक अतुल गाडगीळ यांनी या आराखड्यावर स्वाक्षरी केली असून आराखड्याचा खर्च या दोन्ही यंत्रणा मिळून करणार आहेत.मंडई मेट्रो स्थानक आणि बुधवार पेठ मेट्रो स्थानक यामुळे परिसरातील बसथांबे, ई-रिक्षा, सायकल, दुचाकी, तीनचाकी, चारचाकी गाड्यांच्या पार्किंगचा विचार आराखड्यात करण्यात आला आहे. पादचाऱ्यांसाठी पादचारी मार्ग आणि भूमिगत मार्गांचे नियोजनही करण्यात आले असून तांबट आळी, बुरुड गल्ली, धार्मिक स्थळे, महात्मा फुले मंडई आणि तुळशी बाग या ठिकाणी सेल्फ गाइडेड ऑडिओ टूर सुरू करण्याचे नियोजित आहे. मेट्रोच्या कामांमुळे विस्थापित झालेल्या दुकानांचे मंडईच्या बाजूला नवीन भवन बांधून पुनर्वसन केले जाणार आहे. जुन्या मंडईच्या भवनाला अनुरूप त्याची रचना असेल. नवीन भवनाचे बाह्यरूप मंडईच्या हेरिटेज वास्तूला साम्य असणारे तयार करण्यात येणार आहे.

## संपादकीय »

# आव्हान तरुणाईच्या तणावमुक्तीचे

***ताणतणाव, सामाजिक-आर्थिक स्थित्यंतरे आणि तांत्रिक प्रगतीतून येणारी सुखासीनता आजच्या तरुणाईपुढे विविध प्रकारची मानसिक आव्हाने उभी करीत आहे. त्या आव्हानांना तोंड देण्यासाठी तरुणाईला सक्षम करणे ही समाजावरील मोठी जबाबदारी आहे. ती कशी पार पाडता येईल?***

आजची तरुणाई फार नाजूक वळणावरून चालली आहे. जीवघेणी स्पर्धा, इंटरनेटमुळे चांगल्या गोष्टींबरोबरच मिळणाऱ्या गेम्स, हिंसा आणि कामोत्तेजना वाढवणाऱ्या फिल्म्स, वेबसाइट्स, आभासी स्वातंत्र्याचा मोह, उत्तेजक पदार्थांची व्यसनं अशा अनेकानेक अपायकारक गोष्टींमुळे अनेक तरुणांची आयुष्य बरबाद होताहेत. मानसिक समतोल ढासळतोय. नैराश्य, राग वेगात तरुणाईत पसरतोय. सर्वच तरुणाईबाबत हे घडतंय असं नाही. काहीजण किंवा जणी प्रामाणिकपणे मूल्याधिष्ठित विचारसरणी अनुसरून, कठीण परिस्थिती स्वीकारून, आपल्यासाठी चांगलं काय आहे याचा विचार करून हिंमतीने, ध्येयाकडे मार्गक्रमण करत आहेत. त्यांच्या घरातील संबंधही सौहार्दपूर्ण आहेत.

मित्र-मैत्रिणी, प्रियकर-प्रेयसी आदी रिलेशनशिप असेल तर ती जबाबदारीचं भान ठेऊन आहे. सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने केला जातोय. एकूण सर्व आलबेल आहे. अशा तरुणांचा ॲडव्हर्सिटी कोशंट चांगला आहे. (शांत राहून कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्याची क्षमता.)

सद्यस्थितीत नैतिकतेची परिमाणं बदललेली आहेत. ती बदलत्या काळानुरूप, पिढी दरपिढी तशी नेहमीच बदलतात. आपण करीत असलेली गोष्ट, कृती योग्य की अयोग्य यापेक्षा त्याचे परिणाम आपल्यासाठी अंतिमतः चांगले की वाईट हे तपासून पहाणं महत्त्वाचं. काहीजण परिणामांचा विचार न करता बेभानपणे, बेजबाबदारपणे स्वैराचार करतात. त्याचे परिणाम त्यांना स्वतःला आणि कुटुंबालाही भोगावे लागतात. या सगळ्याला ते जबाबदार असतातच; पण बऱ्याचदा पालकांची त्यांच्याशी असलेली वागणूक, क्वचित, पालकांची बेभान आणि बेजबाबदार वागणूकही मुलांना ताणाखाली आणू शकते.

आज मुलांवर अपरिमित ताण आहेत. जीवघेणी स्पर्धा, चंगळवाद, अतिमुक्त वातावरण, तुटलेले नातेसंबंध इत्यादींमुळे तणाव वाढतो. त्यावर स्वस्थतेसाठी चुकीची पावलं उचलणं, चुकीचं वागणंही घडू शकते. मग सहज मिळणाऱ्या सिगरेट, दारू वगैरे गोष्टी तात्कालिक स्वस्थता देतात. हल्ली मुला-मुलींची निकोप, मर्यादा पाळून असलेली मैत्री स्वागतार्हच आहे. पण मर्यादा ठरवायच्या कशा, कोणी आणि का, हे प्रश्न मुलं विचारतात.

# धारावीचं घबाड अदानीच्या घशात!



भूमिका

विक्रांत पाटील

8007006862



धारावीचं घबाड शेवटी अदानीच्याच घशात घालण्यात आले आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पातून आता अदानीला मुंबईतील वांद्रा-कुर्ला या मध्यवस्तीतील प्राईम लोकेशनमध्ये एक कोटी चौरस फुटांहून अधिक जागा आंदण मिळणार आहे.

धारावीचं घबाड शेवटी अदानीच्याच घशात घालण्यात आले आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पातून आता अदानीला मुंबईतील वांद्रा-कुर्ला या मध्यवस्तीतील प्राईम लोकेशनमध्ये एक कोटी चौरस फुटांहून अधिक जागा आंदण मिळणार आहे. त्यातून आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असा लौकीक मिळविलेल्या धारावीचा चेहरामोहरा 2040 पर्यंत पूर्णतः बदलणार आहे. अदानी समूहाने 5,069 कोटी रुपयांच्या बोलीसह हा धारावी पुनर्विकास प्रकल्प खिशात घातला आहे. येत्या 17 वर्षात हा प्रकल्प पूर्ण करायचा आहे. याशिवाय, पुढील सात वर्षांत पुनर्वसन पूर्ण करण्याचे राज्य सरकारचे उद्दिष्ट आहे.

अदानी रियल्टी, डीएलएफ आणि नमन ग्रुप या तीन कंपन्यांनी धारावीचा पुनर्विकास आणि झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी निविदा सादर केल्या होत्या. आज, 29 नोव्हेंबर रोजी या आर्थिक निविदा उघडल्या गेल्या. गेल्या 15 वर्षात महाराष्ट्र सरकारने पुनर्विकासासाठी किमान चार प्रयत्न केले. मात्र, आजवर कोणत्याही निविदा प्रत्यक्षात आल्या नाहीत. त्यामुळे गेल्या 15 वर्षांतील अनेक अयशस्वी प्रयत्नांनंतर, आता अखेर अदानीकडून धारावीच्या पुनर्विकासाला आणि विकासाच्या स्वप्नपूर्तीला सुरुवात होईल.

यात नमन समूह तांत्रिक बोलीमध्ये पात्र ठरला नाही. त्यामुळे अदानी आणि डीएलएफ या दोनच आर्थिक निविदा उघडल्या गेल्या. अदानी समूहाची बोली 5,069 कोटी रुपयांची होती, तर डीएलएफची बोली 2,025 कोटी रुपये होते. राज्य सरकारच्या मान्यतेने आता पुढील प्रक्रिया सुरू होईल, असे धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवास यांनी "लय भारी"ला सांगितले. धारावीच्या पुनर्विकासासाठी विशेष उद्देश वाहन (एसपीव्ही) देखील तयार केले जाणार आहे. या 20,000 कोटी रुपयांच्या प्रकल्पातील विजेत्याची निवड सर्वोच्च प्रारंभिक गुंतवणूक प्रतिज्ञापत्राच्या आधारावर केली जाते. येत्या 17 वर्षात हा प्रकल्प पूर्ण करण्याचे आणि पुढील सात वर्षांत पूर्ण पुनर्वसन करण्याचे महाराष्ट्र सरकारचे उद्दिष्ट आहे. 2019 मध्ये अयशस्वी प्रयत्न केल्यानंतर राज्य सरकारने यंदा 1 ऑक्टोबर रोजी धारावीच्या पुनर्विकास आणि पुनर्वसनासाठी जागतिक निविदा प्रक्रिया पुन्हा सुरू केली होती. 11 ऑक्टोबर रोजी झालेल्या प्री-बिड बैठकीत भारत, संयुक्त अरब अमिराती आणि दक्षिण कोरियातील आठ कंपन्यांनी धारावीच्या पुनर्विकासात रस दाखवला होता. तथापि, केवळ तीन कंपन्यांनी पुनर्विकासासाठी निविदा सादर केल्या.

300 एकरमध्ये पसरलेले धारावी हे औषध, चामडे, पादत्राणे आणि कपडे तयार करणाऱ्या अनेक लहान-मोठ्या, असंघटित उद्योगांचे केंद्र म्हणून ओळखले जाते. हे मध्य मुंबईतील व्यावसायिक केंद्र, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) आणि दक्षिण मुंबईच्या अगदी जवळ आहे. अंदाजे एक कोटी लोकसंख्येसह, धारावी ही जगातील सर्वात दाट लोकवस्ती असलेल्या झोपडपट्ट्यांपैकी एक आहे. 2008 मध्ये 'स्लमडॉग मिलेनियर' चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर धारावीला जगभर लोकप्रियता मिळाली.

# वृद्धांची संख्या वाढते आहे, 'वृद्धमित्र' कधी वाढणार?

**वृद्धांनाही फिरायला जावेसे वाटते, विविध विषयांवर गप्पा माराव्याशा वाटतात, त्यांच्याही अनेक शारीरिक-मानसिक समस्या असतात. अशा एकाकी वृद्धांसाठी राबविल्या जात असलेल्या उपक्रमातून हाती आलेली आकडेवारी वृद्धांच्या गरजा अधोरेखित करणारी आहे...**

वृद्धांना कोणी 'पिकलेले पान' म्हणते, कोणी म्हणते, 'त्यांचे आयुष्य जगून झाले आहे, आता आणखी जगून ते काय करणार?', 'त्यांच्या अडचणी तरी काय असणार? खाऊनपिऊन सुखी आहेत, त्यांना दोन वेळचे जेवण मिळाले तरी पुरेसे आहे.' परंतु वृद्धांच्या संपर्कात येऊ लागल्यावर त्यांच्या अडचणी, त्यांच्यापुढची आव्हाने समजू लागली. साधारण ६०-६५ वर्षे वयापुढचा काळ हा वृद्धावस्था म्हणून गणला जातो. शरीराची कार्यक्षमता आणि इजा किंवा झीज भरून काढण्याची क्षमता कमी होऊ लागते तेव्हा जरण सुरू होते आणि वाढत्या वयाची लक्षणे दिसू लागतात. भारतातील वाढत्या लोकसंख्येनुसार वृद्धांची संख्या लक्षात घेता २००१ साली सुमारे १०२ कोटी ८८ लाख लोकसंख्येपैकी ७ कोटी १० लाख व्यक्ती वृद्धावस्थेत होत्या, तर २०५० सालाच्या सुमारास



हीच संख्या ३२ कोटी, म्हणजे त्या वेळच्या अपेक्षित लोकसंख्येच्या (१५३ कोटी) जवळजवळ २१ टक्के असेल. कुटुंबनियोजन, आरोग्यविषयक सुधारणा आणि दीर्घकालीन रोगांवर नियंत्रण यामुळे अपेक्षित आयुर्मान जसे उंचावेल, तसे एकूण वृद्धांचे प्रमाण वाढतच जाईल.

वृद्धावस्थेकडे सामाजिकदृष्ट्या तसेच वैद्यकीयदृष्ट्या निराळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. वयाची साठी ओलांडली की, आरोग्याचे प्रश्न तुलनेने कमी होतात, पण निवृत्तीनंतर कौटुंबिक, आर्थिक प्रश्न उभे ठाकतात. साधारण सत्तरीपुढील वयात उमेद कमी होऊ लागते, शारीरिक प्रश्न वाढू लागतात, व्याधी वाढून कदाचित संपूर्ण परावलंबित्व आलेले असू शकते. या सर्व वयोगटांमध्ये स्वभावातील बदल, एकटेपण व त्यामुळे मानसिक आणि भावनिक प्रश्नही डोके वर काढू लागतात.

ज्येष्ठांसोबत काम सुरू केले तेव्हा या उपक्रमाचे नाव काय ठेवावे, यावर बरीच चर्चा झाली. त्यांच्यामध्ये काम करताना लक्षात आले की, वृद्धांना आमच्यात एक मित्र सापडतो. तिथून 'वृद्धमित्र' ही संकल्पना पुढे आली. पुण्यातील दोन वस्त्यांपासून वृद्धमित्रांचे काम सुरू झाले. त्यानंतर पुणे महानगरपालिकेसमोर, या प्रकल्पासंदर्भातील सादरीकरण करण्यात आले. महानगरपालिकेने महत्त्वाची भूमिका बजावली. कोविडकाळात वृद्धमित्रांचे काम पुण्यातील इतर वस्त्यांमध्येही सुरू करण्यासंदर्भात महानगरपालिकेने पत्र काढले आणि परवानगी दिली.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिवशक्ती-भिमशक्ती एकत्र येणार!

## ठाकरे गटासोबत युती करण्यास वंचित बहुजन आघाडीचा होकार

। मुंबई। महाईन्यूज ।

मागील काही दिवसांपासून उद्धव ठाकरे गट आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यात युतीसंदर्भात चर्चा सुरू होती. मुंबईतील एक कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर एका मंचावर आल्यानंतर ही युती होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात होती. असे असताना आता वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या रेखा ठाकूर यांनी मोठी माहिती दिली आहे. उद्धव ठाकरे गटातील नेते सुभाष देसाई यांच्याशी दोन बैठका झाल्या असून आम्ही उद्धव ठाकरे गटाशी युती करण्यास तयार आहोत, असे रेखा ठाकूर यांनी सांगितले आहे. "उद्धव ठाकरे गट आणि वंचित बहुजन आघाडी यांची युती होण्याचे संकेत आहेत. आम्ही त्याबाबत सकारात्मक आहोत. मात्र आम्हाला एका गोष्टीवर स्पष्टीकरण हवे आहे. सध्या शिवसेना महाविकास आघाडीचा भाग आहे. महाविकास आघाडीतील तीन पक्षांपैकी शिवसेना हादेखील एक पक्ष



आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडी हा महाविकास आघाडीतील चौथा पक्ष असेल की शिवसेना आणि वंचित बहुजन आघाडी एकत्र लढणार, याबाबत आम्हाला निश्चितता हवी आहे. त्यानंतरच पुढचे बोलणे सुरू होईल," असे रेखा ठाकूर यांनी सांगितले.

"सध्या आमची चर्चा फक्त उद्धव ठाकरे गटाशी सुरू आहे. मात्र महाविकास आघाडीचा आमच्याकडे प्रस्ताव आल्यास आम्ही त्यावर चर्चा करू. पूर्ण चर्चा केल्यानंतरच हा निर्णय घेण्यात येईल. आम्ही आगामी निवडणुकीत कोणासोबतही जाणार नाही, अशी काँग्रेसची भूमिका आहे. त्यामुळे आम्हाला थोडी संदिग्धता आहे. काँग्रेस तसेच इतर पक्षांनी आपली भूमिका स्पष्ट केल्यानंतरच वंचित बहुजन आघाडीला भूमिका घेता येईल," असेही रेखा ठाकूर यांनी स्पष्ट केले.

### शॉर्ट न्यूज

#### नवीन सुखाची पाऊलवाट..."

। मुंबई । महाईन्यूज ।

मागील काही दिवसांपासून अपक्ष आमदार बच्चू कडू नाराज असल्याची चर्चा सुरू होती. महाविकास आघाडी सरकारमध्ये मंत्री असणाऱ्या बच्चू कडू यांना शिंदे-फडणवीस सरकारमध्ये मंत्रिपद मिळालं नाही. त्यामुळे बच्चू कडू नाराज असल्याची चर्चा होती. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्वतंत्र दिव्यांग मंत्रालय सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. या निर्णयानंतर बच्चू कडू आनंदी झाले. याबाबतची प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. अमरावती येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बच्चू कडू म्हणाले की, राज्यात स्वतंत्र 'दिव्यांग मंत्रालय'ला मंजुरी देण्यात आली आहे.

## शिंदे-ठाकरे गटातील वादावर निवडणूक आयोगासमोर १२ डिसेंबरला सुनावणी

### पक्षचिन्हाबाबत होणार निर्णय

। मुंबई । महाईन्यूज ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षात मोठी बंडखोरी झाली. या बंडखोरीनंतर शिवसेना पक्षात उघड-उघड दोन गट पडले. या बंडखोरीनंतर शिंदे गटाने आम्हीच शिवसेना पक्ष असल्याचा दावा केला आहे. तसेच शिंदे गटाने शिवसेनेच्या धनुष्यबाण या निवडणूक चिन्हावरदेखील दावा केलेला आहे. याच वादावर येत्या १२ डिसेंबर रोजी निवडणूक आयोगापुढे पहिली सुनावणी होणार आहे. बंडखोरीनंतर शिंदे गटाने निवडणूक आयोगाला पत्र लिहित आम्हीच खरी शिवसेना असल्याचे म्हणत पक्ष आणि पक्षचिन्हावर दावा केला होता. त्यानंतर उद्धव ठाकरे गटाने न्यायालयात धाव घेत निवडणूक आयोगाला पक्षचिन्हाबाबत कोणताही निर्णय घेण्यापासून रोखावे अशी मागणी केली होती. मात्र न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावली होती. त्यानंतर आता शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हावरील वादावर येत्या १२ डिसेंबरपासून सुरुवात होणार आहे. याआधी आयोगाने दोन्ही गटांना पक्ष तसेच पक्षचिन्हावर दावा सांगण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे जमा करण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. दोनी गटांना येत्या ९ डिसेंबरपर्यंत निवडणूक आयोगाकडे ही कागदपत्रे जमा करता येणार आहेत.

ऑक्टोबर महिन्याच्या ८ तारखेला निवडणूक आयोगाने शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह गोठवले होते. त्यानंतर अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने या दोन्ही गटांना दोन वेगवेगळी नावे आणि चिन्हे दिली होती. निवडणूक आयोगाच्या या निर्णयानुसार उद्धव ठाकरे गटाला धगधगती मशाल तर शिंदे गटाला ढाल-तलवार हे चिन्ह देण्यात आले होते. असे असले तरी धनुष्यबाण निवडणूक चिन्हावरील वाद निवडणूक आयोगासमोर अद्याप प्रलंबित आहे. या वादावर सुनावणी घेण्यासाठी निवडणूक आगोयाने दोन्ही गटांना कागदपत्रे सादर करण्यास सांगितले होते.



### आरे कारशेड प्रकरण

## सरकारच्या निर्णयाला स्थगिती देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार

। मुंबई । महाईन्यूज ।

मुंबईतील आरे येथील मेट्रो कारशेडवरून महाविकास आघाडी आणि शिंदे-फडणवीस सरकारमध्ये मतभेद निर्माण झाले आहेत. भाजपा नेते देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी 'आरे' येथे मेट्रो कारशेड उभारण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, त्यानंतर सत्तेत आलेल्या महाविकास आघाडी सरकारने हे मेट्रो कारशेड कांजूरमार्ग येथे उभारण्याचा निर्णय घेतला.

पण अलीकडेच शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी बंडखोरी केल्यानं राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळलं आणि शिंदे-फडणवीस सरकार अस्तित्वात



आलं. राज्यात सत्तांतर घडल्यानंतर शिंदे-फडणवीस सरकारने पुन्हा आरे येथेच कारशेड उभारण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयाला स्थगिती देण्यात यावी, अशी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. आरे येथे मेट्रो कारशेड उभारण्याबाबत महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या निर्णयाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने एमएमआरसीएलला आरे येथील झाडे तोडण्याबाबतच्या अर्जाचा 'ट्री ऑथोरिटी'समोर पाठपुरावा करण्यास परवानगी दिली आहे. तसेच न्यायालयाने 'ट्री ऑथोरिटी'ला याबाबत निर्णय घेण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य दिलं आहे.

## "बालेकिल्ले हलत असतात, यापुढेही हलतील"

### कोकण दौऱ्याआधी राज ठाकरेंचं विधान

। सांगली। महाईन्यूज ।

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे उद्यापासून कोकण दौऱ्यावर जाणार आहेत. तत्पूर्वी आज त्यांचं कोल्हापुरात जंगी स्वागत करण्यात आलं. महालक्ष्मीचं दर्शन घेतल्यानंतर राज ठाकरेंनी पत्रकारांशी संवाद साधला आहे. उद्यापासून आपण कोकण दौरा सुरू करणार



असल्याची माहिती राज ठाकरेंनी दिली. "बालेकिल्ले हलत असतात, ते यापुढेही हलतील" असं विधार राज ठाकरेंनी केलं आहे. पत्रकार परिषदेत राज ठाकरे म्हणाले, "मी नागपुरलाही बोललो होतो, कोणताही लढा प्रस्थापितांच्या विरोधातच असतो, प्रस्थापितांच्या विरोधात दिलेल्या लढ्याला यश आलेलं तुम्ही १९९५ आणि १९९९ मध्ये तुम्ही पाहिलं आहे. त्यामुळे बालेकिल्ले कुणाचे हलत नाहीत, असं काही नसतं, बालेकिल्ले हलत असतात, यापुढेही हलतील." असं विधान राज ठाकरेंनी केलं आहे. माझा पुढचा दौरा पश्चिम महाराष्ट्रात असेल. या दौऱ्याच्या तारखा अजून निश्चित केल्या नाहीत. दुसऱ्या टप्प्यात मी कोल्हापूर, सातारा आणि सांगली या जिल्ह्यांचा दौरा करणार आहे. उद्या सकाळी १० वाजता अंबाबाईचं दर्शन घेऊन कोकण दौऱ्याला सुरुवात करणार आहे, असंही राज ठाकरे म्हणाले.

# महाराष्ट्र- कर्नाटक सीमावादावर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी!

## बोम्मई यांच्या दिल्लीत गाठीभेटी

। नवी दिल्ली ।महाईन्यूज। प्रतिनिधी।

जत तालुक्यातील गावांवर कर्नाटकमधील भाजप सरकारने दावा केल्यामुळे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद पुन्हा उग्र झाला असताना, या प्रकरणावरील प्रलंबित सुनावणी बुधवारी ३० नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयातील या सुनावणीपूर्वी कर्नाटक सरकारने सीमावादाला राजकीय रंग दिला असून कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई मंगळवारी दिल्लीत दाखल होणार आहेत. बोम्मई दिल्लीत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची भेट घेणार आहेत. आत्ता तरी सीमावादाचा मुद्दा न्यायप्रविष्ठ असल्याने केंद्रीय गृहमंत्रालयाला हस्तक्षेप करता येणार नाही. मात्र, बोम्मई केंद्रीय गृहमंत्री अमित शहा



यांच्याशीही चर्चा करण्याची शक्यता आहे. सीमावादासंदर्भात कर्नाटकच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद करणार असल्याने कर्नाटक सरकार या विषयावर आक्रमक झाल्याचे स्पष्ट झाले आहे. बोम्मई यांनी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती शिवराज पाटील यांची समिती नेमली आहे.

राजकीय हालचाली

सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांची बैठक घेतली आहे. राज्य सरकारने मंत्री चंद्रकांत पाटील व शंभूराज देसाई यांची समिती नेमली असून न्यायालयीन प्रक्रियेसंदर्भात समन्वय साधणार आहेत. कर्नाटक सरकारने सोलापूर, अक्कलकोट आणि जतमधील ४० गावांवर हक्क सांगितला असला तरी, एकही गाव कर्नाटकमध्ये जाऊ दिले जाणार नाही, असे प्रत्युत्तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपचे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांना दिले आहे. मात्र, बोम्मई यांच्यावर कर्नाटकमधून दबाव वाढत असून सर्वपक्षीय बैठक घेण्याची मागणी होत आहे.

### सीमाभाग समन्वय मंत्री ३ डिसेंबरला बेळगाव दौऱ्यावर

**कोल्हापूर : महाराष्ट्र सीमाभाग समन्वय मंत्र्यांचा ३ डिसेंबर रोजी बेळगाव दौऱ्यावर जात आहेत. महाराष्ट्र राज्य शासनाने महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न समन्वयक मंत्री म्हणून उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील व उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई यांची गेल्या आठवड्यात नियुक्ती केली. लगेचच मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे अध्यक्ष दीपक दळवी इतरांनी उभयमंत्र्यांना बेळगावला भेट देऊन चर्चा करण्याचे आवाहन केले होते.**

**काल माजी मंत्री जयंत पाटील यांचे पुत्र प्रतीक यांच्या विवाह सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी एकीकरण समितीचे पदाधिकारी गेले होते. त्यांनी मंत्री शंभूराज देसाई यांची भेट घेतली. देसाई यांनी ३ डिसेंबर रोजी बेळगावला येणार असल्याचे सांगितले.**

# सत्तासंघर्ष व शिवसेनेतील फुटीबाबत सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी

।मुंबई ।महाईन्यूज। वृत्तसंस्था।

राज्यातील सत्तासंघर्ष आणि शिवसेना फुटीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठापुढे मंगळवारी सुनावणी होणार आहे. भारताचे सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती एम.आर. शहा, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी, न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती पी.एस. नरसिंहा यांच्या घटनापीठापुढे ही सुनावणी होणार असून आमदार अपात्रतेबाबत न्यायालय कोणती भूमिका घेणार आणि नियमित सुनावणी सुरू होणार का, याविषयी सर्वांना उत्सुकता आहे.

शिवसेना नेते सुभाष देसाई यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारच्या वैधतेला आव्हान दिले असून त्यांना सरकारस्थापनेचा राज्यपालांचा निर्णय आणि विधानसभा अध्यक्षांची निवड रद्दबातल ठरविण्याची मागणी केली आहे. शिवसेनेतून शिंदे गटात गेलेल्या आमदारांना अपात्र ठरविण्याची मागणी देसाई आणि मुख्य प्रतोद सुनील प्रभू यांनी याचिकांद्वारे केली आहे, तर विधिमंडळ गटनेतेपदावरून हटविण्याच्या उद्धव ठाकरे यांच्या निर्णयाला मुख्यमंत्री शिंदे यांनी, तर भरत गोगावले यांच्याऐवजी सुनील प्रभू यांच्या मुख्य प्रतोदपदी नियुक्तीला गोगावले यांनी आव्हान दिले आहे. शिंदे गटातील नेत्यांनी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी अपात्रतेबाबत बजावलेल्या नोटिसांना आव्हान दिले आहे. वेगवेगळ्या मुद्द्यांवर सादर झालेल्या सर्व याचिकांवर घटनापीठापुढे बुधवारी सुनावणी ठेवण्यात आली आहे.

आमदारांच्या अपात्रतेबाबत निर्णय देण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षांचा असून त्यात सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करू नये, शिंदे सरकारने विधानसभेत आपले बहुमत सिद्ध केले असून शिवसेना सोडलेली नसल्याने पक्षांतराचा व अपात्रतेचा प्रश्नच उद्भवत नसल्याचा युक्तिवाद शिंदे गटाने केला आहे.

# ‘गद्दार’ वादावर पडदा

## अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्यात मनोमिलन

।नवी दिल्ली ।महाईन्यूज। वृत्तसंस्था।

राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांचा उल्लेख ‘गद्दार’ असा केला होता. यामुळे गेहलोत आणि पायलट गटात तणावाचे वातावरण निर्माण झालं होतं. सचिन पायलट हे ‘गद्दार’ असून कधीही मुख्यमंत्री होणार नाही, असं वक्तव्य गेहलोत यांनी केलं. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी भाष्य करत दोन्ही नेते पक्षाची संपत्ती असल्याचं म्हणत या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला होता.

“अशोक गेहलोत आणि सचिन पायलट हे दोघेही पक्षासाठी बहुमूल्य संपत्ती आहे. राजस्थानमधील राजकीय परिस्थितीचा भारत जोडो यात्रेवर काही परिणाम होणार नाही. यात्रा राजस्थानात गेल्यावर तिचे भव्य स्वागत होईल, याची मला खात्री आहे,” असं राहुल गांधी म्हणाले होते. राहुल गांधींच्या वक्तव्यानंतर आता अशोक गेहलोत यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.




# ‘सिनार्मस’ची २० हजार कोटींची गुंतवणूक!

।मुंबई ।महाईन्यूज। वृत्तसंस्था।

“महाराष्ट्रात उद्योगांसाठी पोषक वातावरण असून अधिकाधिक उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी पुढे यावे, त्यांना सर्व आवश्यक त्या सुविधा पुरविल्या जातील,” असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज उद्योगांना दिले. इंडोनेशिया येथील सिनार्मस पल्प अँण्ड पेपर कंपनीला आज मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते रायगड जिल्ह्यातील धेरंड येथे २८७ हेक्टर जमिनीचे हस्तांतर केल्यासंबंधीचे पत्र देण्यात आले, त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी हे आवाहन केले.

मंत्रालयात आयोजित या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे ‘सीईओ’ विपिन शर्मा, सिनार्मस पल्प अँड पेपर प्रा. लि. कंपनीचे संचालक सुरेश किल्लम, कंपनीचे भारतातील प्रमुख सिद्धार्थ फोगट आदी उपस्थित



होते. ‘सिनार्मस’ची गुंतवणूक

‘सिनार्मस पल्प अँण्ड पेपर लिमिटेड’ हा आशियातील सर्वांत मोठा कागद निर्मिती क्षेत्रातील उद्योग आहे. हा उद्योग भारतात प्रथमच २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. याद्वारे रोजगाराच्या सात हजार संधी उपलब्ध होणार आहेत. पहिल्या टप्प्यासाठी कंपनीला ३०० हेक्टरऐवजी २८७ हेक्टर एमआयडीसीची जमीन देण्यात आली. सिनार्मस कंपनीने एक ऑगस्ट २०२२ रोजी पाच टक्के आरक्षणाच्या शुल्काची ३७ कोटी रुपये रक्कम भरली आहे. या कंपनीला औद्योगिक प्रोत्साहन अनुदान देण्यास मंत्रिमंडळ उपसमितीने मान्यता दिली आहे. सात वर्षांच्या कालावधीमध्ये केलेल्या गुंतवणुकीच्या १०० टक्के अथवा ४० वर्षांच्या औद्योगिक प्रोत्साहन कालावधीमध्ये राज्यात निर्माण केलेल्या १०० टक्के ढोबळ राज्य वस्तू व सेवाकराच्या प्रमाणात यापैकी जे कमी असेल ते औद्योगिक प्रोत्साहन अनुदानास मान्यता दिली.

**वेदांत-फॉक्सकॉन प्रकल्प महाविकास आघाडी सरकारच्या काळातच गुजरातमध्ये गेल्याचा आरोप सत्ताधाऱ्यांकडून केला जात असला तरी ठाकरे गटाचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी ‘एमआयडीसी’च्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी वेदांत-फॉक्सकॉनच्या अध्यक्षांना पाच सप्टेंबरला लिहिलेले पत्रच आज सादर केले. हा प्रकल्प महाराष्ट्रातच येणार होता; सामंजस्य करार करण्यासाठी वेदांतच्या अध्यक्षांना बैठकीला येण्यासंदर्भात विनंती करणारे हे पत्र असून, महाविकास आघाडी सरकारच्या काळातच हा प्रकल्प गुजरातमध्ये गेल्याचा शिंदे फडणवीस सरकारचा दावा खोटा असल्याचा दावा आदित्य यांनी केला.**

माहिती अधिकारांतर्गत मिळालेल्या माहितीच्या आधारे आदित्य ठाकरेंनी हा दावा केला आहे. “हे पाच सप्टेंबर २०२२ चे पत्र वेदांत फॉक्सकॉनचे चेअरमन अनिल अगरवाल यांना पाठवले होते. या पत्रामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २९ ऑगस्ट २०२२ रोजी घेतलेल्या एका बैठकीचाही उल्लेख आहे. २६ जुलैला या प्रकल्पासंदर्भात मंत्रालयात बैठक झाली होती. पण २९ ऑगस्ट २०२२ रोजी देवेंद्र फडणवीसांसोबतही झालेली बैठक नेमकी कशासाठी होती? वेदांत फॉक्सकॉन प्रकल्प या राज्यात ठेवण्यासाठी होती की दुसऱ्या राज्यात नेण्यासाठी होती? या बैठकीबाबत ‘घटनाबाह्य’ मुख्यमंत्र्यांना माहिती होती का?” असे सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केले. २९ ऑगस्टला देवेंद्र फडणवीसांची बैठक झाल्यानंतर पाच सप्टेंबरला सामंजस्य करारासंदर्भात हे पत्र पाठविले. त्यावर अधिकृत उत्तर न देता, गुजरातला प्रकल्प नेत असल्याचे कंपनीने थेट ट्विटरवर जाहीर केले. याचा नेमका काय अर्थ आहे?, असाही प्रश्न आदित्य ठाकरेंनी विचारला.

# बाथटबमध्येच रंगला विकी-कियाराचा रोमान्स



विकी कौशल आजच्या पिढीचा हार्ट थ्रॉब म्हणून ओळखला जातो. विकी आणि कतरिना यांचे वर्षभरापूर्वीच लग्न झाले आहे. बॉलीवूडच्या कपल्समध्ये त्यांची जोडी सर्वात फेव्हरेट जोडी म्हणून ओळखली जाते. पण सध्या विकीचं नाव कियारा अडवाणी सोबत जोडलं गेलंय त्याची जोरदार चर्चा रंगली आहे. अर्थात यामागचं कारण आहे त्यांचा आगामी सिनेमा 'गोविंदा नाम है मेरा'. या ऑनस्क्रीन जोडीनं सिनेमात खूप बोल्ड सीन्स दिले आहेत,ज्या कारणाने विकीला लोक कतरिनाचं नाव घेत चिमटे काढताना दिसत आहेत. नुकतंच गोविंदा नाम है मेरा सिनेमातलं एक रोमँटिक गाणं रिलीज झालं. सिनेमातील गाण्यात कियारा आणि विकीला रोमँटिक होताना पाहून चाहते मात्र भलतेच उत्सुक झालेले दिसून येत आहेत. कियारासोबत विकीचा रोमान्स पाहून अनेक कतरिनाचे चाहते मात्र मस्करीच्या मूडमध्ये दिसत आहेत. या गाण्याच्या टीझरला विकीनं आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर केले आहे. हे पाहून नेटकऱ्यांनी कमेंट बॉक्समध्ये विकीला कतरिनाचं नाव घेत चिडवायला सुरुवात केली आहे. तर काही लोकांनी या ऑनस्क्रीन कपल म्हणजे कियारा-विकीच्या केमिस्ट्रीची प्रशंसा केली आहे. टीझरमध्ये गाण्याची फक्त एकच ओळ ऐकायला मिळत आहे... ती अशी..'जो तूने पिलाई हुआ शराबी...',पण नेटकरी फक्त यावरच इतके लट्टू झालेयंत की आता ते पूर्ण गाणं कधी पहायला मिळतंय याच्या प्रतिक्षेत दिसत आहेत.

# नेहा पेंडसे लवकरच करणार आगामी चित्रपटाची घोषणा

हिंदी, मराठी अशा दोन्ही माध्यमांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी अभिनेत्री नेहा पेंडसे आज वाढदिवसाचे औचित्य साधून आपल्या चाहत्यांसाठी एक सरप्राईस घेऊन येणार होती. आपल्या नवीन चित्रपटाची ती घोषणा करणार होती. मात्र आपल्या दमदार अभिनयाने मराठी, हिंदी सिनेसृष्टी गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांच्या निधनामुळे या घोषणेची तारीख आता पुढे ढकलण्यात आली आहे. रोहित मित्तल दिग्दर्शित या चित्रपटाची निर्मिती शार्दूल सिंग बायस, नेहा पेंडसे बायस आणि निखिल महाजन यांनी केली असून चित्रपटाचे लेखन श्रीपाद देशपांडे आणि रोहित मित्तल यांचे आहे. सध्या जरी या चित्रपटाचे नाव गुलदस्त्यात असले तरी लवकरच ते प्रेक्षकांसमोर येणार आहे.

सगळ्यांचे आभार मानत नेहा पेंडसे म्हणते, "माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने कुटुंबीयांनी, मित्रमंडळींनी, चाहत्यांनी माझ्यावर जो शुभेच्छांचा वर्षाव केला आहे, त्यासाठी मी सर्वांची खूप आभारी आहे. खूप छान वाटते जेव्हा आपल्यावर कोणी इतके प्रेम करते. या खास दिनी मी माझ्या नव्या प्रोजेक्टची घोषणा करणार होते, मात्र सध्या चित्रपटाच्या घोषणेची ही योग्य वेळ नाही असे मला वाटते. आपल्या सर्वांचे लाडके, ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांचे नुकतेच निधन झाले. सिनेसृष्टीने एक उत्कृष्ट कलाकार गमावला आहे. त्यामुळे या घोषणेसाठी आम्ही थोडी प्रतीक्षा करणार आहोत."

## मी कुठे व्हर्जिन..." लग्न केल्यानंतर नेहा पेंडसेचा गौप्यस्फोट

अभिनेत्री नेहा पेंडसे सध्या मालिका, चित्रपटांपासून दूर आहे. पण तिने आजवर मराठीसह हिंदी, दाक्षिणात्य चित्रपटामध्ये काम केलं. इतकंच नव्हे तर छोट्या पडद्यावरील 'बिग बॉस १२' कार्यक्रमामध्येही तिने सहभाग घेतला होता. 'भाभीजी घर पर है" ही तिची शेवटची हिंदी मालिका. काही दिवसांपूर्वी तिचा 'जून' हा मराठी चित्रपट येऊन गेला होता. नेहा सोशल मीडियावर सक्रीय असते. तितकीच ती सडेतोड स्वभावामुळे प्रसिद्ध आहे. आपली मतं ती ठामपणे मांडत असते. नेहा पेंडसेचे आज अनेक चाहते आहेत. अभिनेत्रींचे खासगी आयुष्यदेखील चर्चेत असते. तिने व्यावसायिक असलेल्या शार्दूल शार्दुल सिंग बायस याच्याबरोबर लग्नगाठ बांधली. शार्दूलने आधी २ लग्न केली होती त्यावरून अनेकांनी नेहा पेंडसेला ट्रोल केलं होत.



## आता आयटम साँग नाही, मुख्य भूमिकेत दिसणार नोरा;



: नोरा फतेहीनं 'टायगर्स ऑफ सुंदरबन','क्रेझी कुक्कड फॅमेली' सारख्या मल्टिस्टारर सिनेमातून आपल्या अभिनयाच्या कारकिर्दीला सुरवात केली होती. त्यानंतर ती मोठ्या पडद्यावर नृत्याकडे वळली. मग मात्र तिनं मागे वळून पाहिलं नाही.. आणि एकामागून एक दर्जेदार सिनेमातील आयटम नंबर आपल्या नावावर करून घेतलं. गेल्या काही वर्षात तर अनेक बड्या शोजची जज म्हणूनही तिला मान मिळू लागला आहे. पण आता तिच्या आयुष्यात नवी संधी तिला मिळाली अन् पुन्हा तिचं नशीब फळफळलं. नोरा एका सिनेमात लीड व्यक्तिरेखा साकारताना दिसणार आहे. सिनेमात तिचा हिरो असणार आहे विक्रांत मैसी. अभिनेत्री म्हणून नोराचा हा पहिला सिनेमा असेल. सिनेमाचं नाव आहे,'ब्लॅकआऊट'. सिनेमा थ्रिलर आहे आणि याला थेट ओटीटीवर रिलीज केलं जाणार आहे. नोराच्या या सिनेमाचं शूटिंग पूर्ण झालं आहे. तसं पाहिलं तर आतापर्यंत नोरानं सिनेमात आयटम सॉंग केलेलं आहे,

## 'मधुरव – बोरू ते ब्लॉग' 3 डिसेंबरपासून प्रेक्षकांच्या भेटीला

लॉकडाऊनच्या काळात मनोरंजन क्षेत्र पूर्णतः बंद असताना "मधुरव"चे ऑनलाइन पद्धतीने प्रयोग केले. त्या उपक्रमाला रसिक श्रोत्यांचा भरभरून प्रतिसादही मिळाला होता. आता



'मधुरव – बोरू ते ब्लॉग' हा कार्यक्रम रंगमंचावर येण्यासाठी सज्ज झाला असून येत्या ३ डिसेंबरला या कार्यक्रमाचा शुभारंभाचा प्रयोग शिवाजी मंदिर, दादर येथे संपन्न होणार आहे. मराठी भाषेच्या जन्मापासून आजपर्यंत भाषेचा झालेला प्रवास, त्यातल्या गमतीजमती-तथ्य यांची गप्पागोष्टी,गायन ,नृत्य, नाट्य,अभिवाचन यातून होणारी दर्जेदार सुरेख गुंफण म्हणजे "मधुरव – बोरू ते ब्लॉग" हा कार्यक्रम. तथाकथित लेखक नसलेले पण लिखाणातून व्यक्त होणारे तुमच्यातले (प्रेक्षकांमधले) काही निवडक लेखक त्यांना रंगमंचावर बोलवून त्यांच्या लिखाणाचे सादरीकरण करणे.

# पुण्याच्या 'गोल्डन बॉय'ची 'बिग बॉस' मध्ये एंट्री !

पुण्याचा गोल्डन बॉय म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या सनी नानासाहेब वाघचौरे हा बिग बॉस १६ चा पहिला वाईल्ड कार्ड स्पर्धक म्हणून प्रवेश करणार आहे. कलर्स टी.व्ही. वरील प्रसिद्ध शो 'बिग बॉस' चा आता १६ वा सीजन चालू आहे. हा कार्यक्रम प्रेक्षकांसाठी अत्यंत मनोरंजात्मक बनला आहे.

शो मधील स्पर्धक ट्रॉफीवर नाव कोरण्यासाठी सज्ज झाले असतानाच आता बिग बॉस १६ मध्ये वाईल्ड कार्ड स्पर्धक म्हणून प्रवेश करतील. त्यात पहिलाच स्पर्धक सनी वाघचौरे बनला आहे. सनी हा मूळचा पुण्यातील असून, तो सोशल मीडियावर 'गोल्डन बॉय' या नावाने प्रसिद्ध आहे सोशल मीडियावर त्याचा अनेक चाहता वर्ग आहे तशीच त्याची मोठी फॅन फॉलोविंग आहे. सनीने इंस्टाग्राम वर बिग बॉस ची एक पोस्ट शेअर केली आहे. त्यामध्ये त्यानं लिहिलंय कि, "शेवटी स्वप्न पूर्ण झाले" बिग बॉस १६ मध्ये एंट्री होत आहे. या पोस्टला १ लाखाहून अधिक जणांनी लाईक्स केले आहे. त्यामुळे आता सनीच्या एन्ट्रीनं बिग बॉस शोमध्ये रंगत येणार आहे. सनी वाघचौरे आणि बंटी गुज्जर हे गोल्डन बॉय म्हणून प्रसिद्ध आहेत. हे दोघेही पुण्याचे तरूण आहेत. सोशल मीडियावर त्यांचे जबरदस्त फॅन फॉलोईंग आहे.



## पिंपरी-चिंचवडकर ऋतुराज गायकवाडची

# अभिमानास्पद कामगिरी!

## विजय हजारे चषक : सहा चेंडूत 7 षटकार अन् 43 धावा

पिंपरी।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

**पिंपरी-चिंचवडकर क्रिकेटपटू ऋतुराज गायकवाडने सोमवारी कर्णधारपदाला साजेशी खेळी खेळली. विजय हजारे ट्रॉफीच्या उपांत्यपूर्व फेरीत त्याने यूपीविरुद्ध १५९ चेंडूत नाबाद २२० धावांची खेळी केली. ज्यामध्ये १० चौकार आणि १६ षटकार लगावले. त्याने एकाच षटकात ७ षटकारांसह ४३ धावा केल्या.**

या स्पर्धेतील शेवटच्या ८ डावांमधील ऋतुराजचे हे सहावे शतक आहे. यावरून त्याच्या सर्वोत्तम फॉर्मचा अंदाज लावता येतो. आयपीएलमध्ये तो चेन्नई सुपर किंग्जचा महत्त्वाचा भाग आहे. २५ वर्षीय ऋतुराजचे लिस्ट-ए कारकिर्दीतील हे १३वे शतक आहे.

डावखुरा फिरकी गोलंदाज शिवा सिंग डावातील ४९ वे षटक टाकत होता. त्याने ५वा चेंडू नो बॉल टाकला.

यावरही ऋतुराजने षटकार ठोकला. अशाप्रकारे, त्याने एकाच षटकात ७ षटकार लगावत एकूण ४३ धावा केल्या. लिस्ट-ए क्रिकेटमध्ये एका षटकात ७ षटकार लगावणारा तो जगातील पहिला फलंदाज ठरला आहे.




सामन्याच्या सुरुवातीला यूपीने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्राची सुरुवात चांगली झाली नाही. संघाने ४१ धावांत २ विकेट गमावल्या होत्या. राहुल त्रिपाठी ९ आणि सत्यजीत ११ धावा करून बाद झाले. मात्र कर्णधार आणि सलामीवीर ऋतुराज गायकवाड एक बाजू सांभाळून खेळत राहिला. त्याने अंकित बावणेसोबत तिसऱ्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी केली. अंकित ५४ चेंडूत ३७ धावा करून बाद झाला.

### 109 चेंडूत केले शतक पूर्ण..

**ऋतुराज गायकवाडने १०९ चेंडूत शतक पूर्ण केले. तसेच १३८ चेंडूत १५० धावांचा टप्पा गाठला. म्हणजेच त्याच्या पुढच्या ५० धावा फक्त २९ चेंडूत आल्या. १५९ चेंडूत २२० धावा केल्यानंतर तो नाबाद राहिला. त्याने अझीम काझीसोबत चौथ्या विकेटसाठी शतकी भागीदारी केली. अझीम ४२ चेंडूत ३७ धावा करून बाद झाला. त्याने २ चौकार आणि २ षटकार लगावले. त्याचबरोबर कार्तिक त्यागी हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने ६६ धावांत ३ बळी घेतले.**

## बीसीसीआय निवड समितीच्या प्रमुखपदासाठी दिग्गज मैदानात

नवी दिल्ली, ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

टी20 विश्वचषकातील अपयशानंतर बीसीसीआयने संपूर्ण निवड समिती बरखास्त केली होती. यापुढील रणनीती अंमलात आणण्यासाठी संघाची निवड करणारा चेहरा कोण असेल यावर सर्वांच्याच अपेक्षा आहेत. बीसीसीआयने मागवलेल्या अर्जाची अंतिम तारीख 28 नोव्हेंबर होती. आता या पदासाठी अर्ज केलेल्यांची नावे समोर येत आहेत.

दास सध्या पंजाबमध्ये फलंदाजी प्रशिक्षक म्हणून काम करत आहे. याआधी तिने राष्ट्रीय क्रिकेट अकादमी आणि भारतीय महिला संघासोबत प्रशिक्षक म्हणून



काम केले आहे. दास यांची नियुक्ती झाल्यास, त्यांच्या अनेक सहकार्यांच्या अंदाजानुसार, ते ओडिशाचा त्यांचा माजी सहकारी देबाशीस मोहंती यांची जागा घेतील. भारताचा माजी वेगवान गोलंदाज मोहंतीने निवडकर्ता म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे, त्याने यापूर्वी ज्युनियर क्रिकेटमध्ये काम केले आहे. अर्जदारांमध्ये बदानी हे देखील खरे दावेदार आहेत, ज्याची त्यांनी पुष्टी केली नाही किंवा नाकारली नाही. तो सध्या आयपीएलमध्ये सनरायझर्स हैदराबादचा क्षेत्ररक्षण प्रशिक्षक म्हणून काम पाहत आहे.

### सल्लागार समितीमार्फत निवड

नयन मोंगिया, मनिंदर सिंग, शिव सुंदर दास आणि अजय रात्रा या नावांनी या पदासाठी अर्ज केले आहेत. आता बीसीसीआय क्रिकेट सल्लागार समिती नियुक्त करेल, जी त्यांची मुलाखत घेईल. नवीन निवड समितीचे पहिले काम 2023 मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या घरच्या मालिकेसाठी संघ निवडणे असेल. दरम्यान, चेतन शर्मा यांच्या नेतृत्वाखालील आउटगोइंग पॅनल कार्यरत राहणार आहे. त्याचे सदस्य आता विजय हजारे करंडक, देशांतर्गत 50 षटकांची स्पर्धा आणि कूचबिहार चषक या स्पर्धांचे ते काम करणार आहेत.

## सेनेगलसाठी 20 वर्षांनी उगवला सोनेरी

नवी दिल्ली, ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



फिफा वर्ल्डकप 2022 मध्ये आज ग्रुप A मधील सेनेगल विरूद्ध इक्वाडोर आणि कतार विरूद्ध नेदरलँड यांच्यात सामना रंगला. सेनेगलने इक्वाडोरचा 2 - 1 असा पराभव करत तब्बल 20 वर्षांनंतर वर्ल्डकपची बाद फेरी गाठली. विशेष म्हणजे त्यांचा स्टार फुटबॉलर सादिओ मानेच्या अनुपस्थितीत सेनेगलने ही कामगिरी करून दाखवली आहे. दुसरीकडे यजमान कतारला आपला ग्रुप स्टेजमधील शेवटचा सामना देखील जिंकता आला नाही. नेदरलँडने त्यांचा 2 - 0 असा एकतर्फी पराभव केला. नेदरलँडने 9 वेळा वर्ल्डकपमधील ग्रुप स्टेज पार केली आहे. त्यांनी प्रत्येक वर्ल्डकपमधील ग्रुप स्टेज पार करण्याचे आपले रेकॉर्ड अबाधित ठेवले.

सेनेगलने इक्वाडोरविरूद्धच्या सामन्यात पहिला हाफ संपण्यासाठी अवघा एक मिनिट असताना पहिला गोल केला. इस्मैला सारने 44 व्या मिनिटाला पेनाल्टीवर संघाचे गोलचे खाते उघडले. त्यानंतर इक्वाडोरने दुसऱ्या हाफमध्ये 67 व्या मिनिटाला बरोबरीचा गोल करून सामन्यात चुरस निर्माण केली. मोईसेस सैसेडोने टोरेसच्या साथीने इक्वाडोरचा पहिला गोल केला. मात्र त्यानंतर सेनेगलने अवघ्या 3 मिनिटात इक्वाडोरचा गोलपोस्ट भेदला आणि आपला दुसरा गोल करून सामन्यात 2 - 1 अशी आघाडी घेतली. फ्री हिट मिळाल्यानंतर सेनेगलच्या कालीडोऊने हा शानदार गोल करत सेगेनलचे राऊंड 16 मधील तिकिट फायनल केले. याचबरोबर सेनेगल 1990 नंतर दक्षिण अमेरिका खंडातील संघाविरूद्ध विजय मिळवणारा पहिला आफ्रिकी देश ठरला.

दुसरीकडे यजमान कतार आणि नेदरलँड यांच्यातील सामना एकतर्फी झाला. नेदरलँडच्या कोडी गाक्पोने 26 व्या मिनिटालाच यजामन कतारवर गोल डागत त्यांना बॅकफूटवर ढकलले. नेदरलँडने उत्तम आणि अचूक पासेसच्या जोरावर सामन्यावर नियंत्रण मिळवले. पहिल्या हाफमध्ये 1 - 0 अशी आघाडी घेतल्यानंतर नेदरलँडने दुसऱ्या हाफच्या चौथ्या मिनिटालाच दुसरा गोल करत ही आघाडी 2 - 0 अशी वाढवली. फ्रँकी दे जाँगने 49 व्या मिनिटाला दुसरा गोल केला. दरम्यान, संपूर्ण सामन्यात कतारला नेदरलँडच्या गोलपोस्टवर आक्रमण करण्याची 5 वेळाच संधी मिळाली. त्यातील 3 वेळा त्यांनी ऑन टार्गेट शॉट्स मारले. मात्र नेदरलँडचा गोलकिपर नोपर्टने कतारला गोल करण्याची एकही संधी दिली नाही. ग्रुप A मध्ये नेदरलँडने आपले 3 पैकी 2 सामने जिंकले तर एक बरोबरीत सोडवला. ते 7 गुण घेऊन ग्रुपमध्ये अव्वल स्थान पटकावत बाद फेरीसाठी पात्र झाले आहेत. तर सेनेगलने 3 पैकी 2 सामने जिंकत 6 गुणांसह ग्रुपमध्ये दुसरे स्थान पटकावले. त्यांना नेदरलँडविरूद्ध पराभव सहन करावा लागला होता. यजमान कतारला 3 पैकी एकही सामना जिंकता आलेला नाही. त्यांनी आपल्या तीन सामन्यात एकच गोल केला असून तब्बल 7 गोल स्विकारले.